Established: July 2001

II TAMASO MA JOTIRGAMAY II

TALE VIBHAG SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

D.G. TATKARE ARTS & COMMERCE COLLEGE, TALA

Tal. Tala, Dist. - Raigad - 402 111.

Permanently Affiliated to University of Mumbai, NAAC Accredited with CGPA of 3.07 at 'A' Grade

Best College Award 2023-2024

Phone/ Fax: 02140 269575 / 9273499354, E-mail: dgtcollegetala1@yahoo.co.in

Govt. Recognized wide lettes No. NCC/Mashi-3 Date 29 Jan.2001 Muvis. 2003/(2/03) Mashi. 03 Dated 3 June 2003

Registration No. - 66 / 1988

Ref. No.: /20 /20 Date: / /20

मराठी भाषा पंधरवडा

१४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६

पुण्य नगरी

द. ग. तटकरे महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन; विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

तळा : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळाच्या वतीने बुधवारी ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीची जोपासना करणे, ज्ञानसंपादनाची आवड निर्माण करणे आणि मराठी साहित्याची ओळख करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट देत मोठा प्रतिसाद दिला. ग्रंथांची पाहणी केली व वाचनाबाबत उत्सुकता व्यक्त केली.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन सकाळी ११ वाजता संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, ग्रंथपाल मनोज वाढवळ, मराठी विभागप्रमुख विजय चव्हाण यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांनी ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी केली व ग्रंथसंपदेचे कौतुक केले.या ग्रंथ प्रदर्शनात विविध विषयांवरील दुर्मिळ ग्रंथ, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, स्पर्धा परीक्षांची पुस्तके तसेच शैक्षणिक व संदर्भ ग्रंथांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

लोकमत

द.ग. तटकरेमध्ये भरले ग्रंथ प्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

तळा : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळाच्या वतीने बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ रोजी ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीची जोपासना करणे, ज्ञान संपादनाची आवड निर्माण करणे आणि मराठी साहित्याची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ठीक ११ वाजता संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, ग्रंथपाल मनोज वाढवळ, मराठी विभाग प्रमुख विजय चव्हाण यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर मान्यवरांनी ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी केली.

Hello Raigad
Page No. 4 Jan 15, 2026
Powered by: erelego.com

दैनिक
साहस वार्ता
RNI No. MAHMUL/2015/67123
संपादक : श्री. श्रीकांत शिवनाथ मुळे
https:/www.esahas.com https:/www.instagram.com/sahasvarta https:/www.facebook.com/sahasvarta01 https:/www.youtube.com/sahasvarta WhatApp : 8409494949

मराठी भाषा ही शिक्षणाचा आत्मा आहे : सुदर्शन खांबल

साहस वार्ता

तळे (पुरुषोत्तम मुळे) : द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा आणि जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा यांच्यातील सामंजस्य करार (चजण) अंतर्गत ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ साजरा करण्यात आला.

या पंधरवड्यानिमित्त मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ७.०० वाजता शिक्षणातील मराठी भाषेचे महत्त्व या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून श्री. सुदर्शन बाळाराम खांबल (माजी विद्यार्थी - द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा) उपस्थित होते. मार्गदर्शन करताना श्री. सुदर्शन खांबल यांनी मराठी ही भारतातील एक प्राचीन, समृद्ध आणि अभिजात परंपरा असलेली भाषा आहे. ही भाषा इंडो-आर्यन भाषा कुटुंबातील असून प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे.

मराठी भाषेची उत्पत्ती महाराष्ट्रातील महाराष्ट्री प्राकृत या भाषेपासून झाली आहे. सुमारे आठव्या शतकापासून मराठी भाषेचा लिखित वापर सुरू झाल्याचे पुरावे आढळतात. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, एकनाथ, समर्थ रामदास यांनी मराठी भाषेला वैचारिक आणि साहित्यिक उंची प्राप्त करून दिली. शिक्षण प्रक्रियेत मातृभाषेचे महत्त्व, ज्ञानसंपादनातील मराठी भाषेची भूमिका आणि विद्यार्थ्यांनी मराठीचा अभिमान बाळगण्याची गरज यावर सविस्तर विवेचन केले. जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीचे महत्त्व वाढले असले तरी मराठी भाषेचे संवर्धन, जतन आणि प्रसार करणे ही आपली सामाजिक व सांस्कृतिक जबाबदारी आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. साक्षी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मराठी विभाग प्रमुख श्री. विजय चव्हाण यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे शैक्षणिक व सामाजिक जीवनातील स्थान अधोरेखित केले.यानंतर जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील प्र. प्राचार्य डॉ. सचिन व्ही. बंगाळे यांनी मनोगत व्यक्त करत मराठी भाषा संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील प्राचार्य डॉ. एन. एस. यादव उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी भाषेचा वापर शिक्षण, संशोधन व दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वाढवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील ग्रंथपाल प्रा. धवन एस. के. यांनी आभार मानून आजचा कार्यक्रम संपन्न झाले असे जाहीर केले.